ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VII/Jan 2012pp.1-4

Research Paper

# दशहतवाद - बदलते स्वरूप व तंत्र आणि राष्ट्रापुढील आव्हान

प्रा. प्रशांत सराफ
सैनिकशास्त्र विभाग
श्री शिवाजी महाविद्यालय परभणी ४३१४०१

## प्रस्तावना :-

आज २१ व्या शतकात जगातील अनेक राष्ट्रासमोर दहशदवादाचे भीषण आव्हान दिसून येते. नवीन शस्त्रास्त्रे आणि वेगवेगळया तंत्राचा वापर करताना दहशतवादी संघटना दिसून येतात. त्यामुळे ते आव्हान संघर्षपूर्ण व दिर्घकाळ असणारे आहे. हे जाणीवपूर्वक लक्षात घ्यावे लागेल. ११ सप्टेंबर २००१ ला अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर या विरूद्ध जागतिक आव्हान म्हणून युद्धाचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

भारतामध्ये इ. स. १९८० च्या दशकात या दहशतीविरूद्ध युद्ध सुरू झाले छुप्या युद्धाचे स्वरूप काश्मीर पंजाब या राज्यापुरतेच मर्यादीत होते पण अलीकडच्या काळात देशातील विविध प्रमुख शहरांना दहशतवादाने आपले लक्ष बनविलेले दिसते हजारो निरपराध मनुष्य सैनिक राजकीय नेते यांचा बळी दहशतवादाने घेतला आहे म्हणूनच या आव्हानाचा राष्ट्र सुरक्षेच्या दृष्टीकोनातून विचार करणे अंत्यत महत्त्वाचे ठरते. अमेरीकेने १ मे २०११ ला कुख्यात अतिरेकी ओसामा बिन लादेनला ठार केले पण तरीही द. अशियात दहशतवाद संपलेला नाही भारताला आजही दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. दहशतवाद ही मानवनिर्मिती कृत्रीम आपत्ती आहे अशा प्रकारचे हल्ले झाल्यावर व्यवस्थापन होणे देखील गरजेचे आहे. त्यामुळेच दहशतवाद ही समस्या समाजावून घेणे महत्त्वाचे ठरते.

### दहशतवाद म्हणजे काय ? :-

दहशतवाद बददल भूमिका स्पट करताना वेगवेगळया विचारवंतानी राष्ट्रसरकारने आपल्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. उदा ः पाकिस्तान भारतातील विशेषतः काश्मीरच्या संदर्भातील दहशतवादी लढयाला स्वातंत्र योद्धयांचा लढा म्हणून संबोधते म्हणूनच भारताने दहशतवादी हा दहशतवादीच असतो असे स्पष्ट केलेले आहे खंया अर्थाने दहशतवाद पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल

१. राजकीय सामाजिक आर्थिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी हिंसेचा उपयोग म्हणजे दहशतवाद होय.

२. इस्त्रायलचे नेते बेंजामिन नेत्यान्याहू यांच्या मते ः आपले राजकीय उद्दीष्ट साधण्यासाठी निष्पाप लोंकाची जाणूनबूजून आणि पद्धतशीर पणे केलाली हत्या अथवा जखमी करून त्यांना ठार मारून समाजामध्ये निर्माण केलेले भितीचे वातावरण म्हणजे दहशतवाद होय.

राजकीय ध्येयासाठी जनतेमध्ये दहशत निर्माण करण्याचे साधन म्हणून दहशतवादाकडे बघितले जाते. शासनच्या सरकारच्या धोरणाविरूद्ध केलेली सशस्त्र कार्यवाही म्हणीनही उल्लेख केला जातो

### पार्श्वभूमी :-

दहशतवाद उगम हा जगाच्या राजकारणात प्राचीन काळापासून झालेला येतो पण राजकीय सामाजिक धोरण नसल्यामुळे घडणाया घटना हिंसा म्हणून बघितल्या जात होल्या.

दहशत (terror) हा शब्द terrere या लॅटिन शब्दापासून आलेला आहे. थरकाप किंवा घाबरविणे त्याचा अर्थ होतो तसे पाहिले तर युद्धशास्त्राचा प्रणेता सुंझ या चिनी तत्त्ववेत्याने इ. स. २५०० वर्षापूर्वी दहशतवादाची महत्ता विशद केली होती.

"Kill one frighten- ten thousand" एकाला भर बाजारात मारा व दहा हजारांना भयभित करा हे त्याचे तंत्र होते मध्ययुगीन काळात इ. स. १७९० च्या फेंच राज्यक्रांती च्या दरम्यान दहशतवादाचे तंत्र प्रामुख्याने वापरात आले जैकोबी अतिरेक या नावाने ते सर्वपरिचित झाले जागतिक पातळीवर इस्त्राइल राष्ट्राच्या निर्मितीनंतर पश्चिम अशियात सुरूवात झालेली दिसते.

भारताच्या संदर्भात विचार केला तर याचा मुळ उगम १९४७ च्या धार्मिक आधारावर झालेल्या फाळणीत काश्मीरचे भारतात विलनीकरण १९७१ चे बांग्लादेश मुक्ती युद्ध यात दिसून येते इ. स. १९८० च्या दशकात दहशतवादाचा प्रभाव भारतात वाढला कारण १९७९ ला अफगनिस्तान मध्ये रशियाने सैनिकी हस्तक्षेप केला अमेरिकेकडून पाकिस्तान मार्फत दिली जाणांया शस्त्रास्त्राची मदत अफगान बंडखोरा सोबतच भारताविरूद्ध पाकिस्तान ने वापरली भारतासोबत समोरासमोरच्या युद्धात निभाव लागणार नाही म्हणूनच पाकिस्तानने दहशतवादाच्या माध्यमातून छुपे युद्ध ह्यपरेक्ष्द्धारह सुरु केलेले दिसून येते.

### दहशतवाद कारणे प्रकार :

भारतात दहशतवाद निर्माण करण्यामागे पाकिस्तान हे राष्ट्र मुख्यतः दिसून येते. धर्माच्या आधारावर भारतातील इस्लामिक जनतेला फुस लावण्याचे तंत्र अवलंबविलेले दिसते काश्मीर मधील परिस्थिती अशांत करण्यास त्यांनी या तंत्राचाच आधार घेतलेला दिसून येते भारतामध्ये अस्थिरता निर्माण करण्यांया दहशतवादी गटास राजकीय आश्रय देणे हे त्यांचे महत्वाचे धोरण आहे.

सध्याच्या परिस्थितीत भारतात दहशतवादाचे वेगवेगळे प्रकार दिसून येतात

१ प्रादेशिक दहशतवाद ःपंजाब आसाम काश्मीर या राज्यांमध्ये आढळून येतो.

२. धार्मिक दहशतवाद ःधर्माच्या आधारावर एकत्र येऊन हिंसक गटाची निर्मिती करणे उदाः सिमी हिंदुत्ववादी संघटनांचा सहभाग इ.

३. सीमेपलीकडून होणारा दहशतवाद ःअंतर्गत लोंकांना वाहय राष्ट्रची मदत तसेच बाहेरील दहशतवादाचे अचानक आकमण.

यामुळे भारताच्या भौगोलिक अंतर्गत सामाजिक आर्थिक सुरक्षेला धोका निर्माण होत आहे

### दहशतवादाचे स्वरूप :-

दहशतवादाच्या समस्येने जागतिक स्वरूप प्राप्त केले असले तरी राष्ट्रच्या अंतर्गत सुरक्षेच्या चौकटीत बघणे आवश्यक आहे. भारत गेली ३० वर्ष दहशतवाद विरूध्द लढा देत आहे धार्मिक गट सीमेपलीकडून हे आव्हान निर्माण केलेले आहे पंजाब काश्मीर या भौगोलिक राज्यापुरता मर्यादित असणाया दहशवादाने भौगोलिक मर्यादा ओलांडालेल्या दिसतात मुंबई दिल्ली चेन्नई कोलकत्ता बंगलोर कानपूर हैद्राबाद पुणे अहमदनगर इ. महत्वपुर्ण शहरे त्यांची

लक्ष्य ठरू पाहत आहे भारताची आर्थिक हानी घडवून विकास प्रकिया मध्ये अडथळा आणण्याचे हे त्यांचे नवीन तंत्र दिसून येत आहे. त्यामुळे हे छुपे युद्ध समाजाच्या दाराशी उभे टाकलेले आहे.

दहशतवाद हा दिशाहीन स्वरूपाचा विनाश नसतो त्यामागे काही निश्‍चित उद्देश असतात प्रेरणा देणारी विचारप्रणाली असते कार्यपुर्ण करण्यासाठी संघटना असतात दृढ निष्ठा ठेवणाया व्यक्ती या तंत्राच्या माध्यमतून लढा देतांना दिसतात. सामान्य जनतेत निर्माण होणारे भय हा दहशतवादी कारवाई चा सर्वात महत्वाचा परिणाम असतो त्या कारवाईत बळाचा वापर केला जात असतो. विध्वंसक शस्त्रास्त्रो वापरली जातात सर्वसामान्य जनता हे त्यांच्या र्मायाचे लक्ष असते. ज्याला स्फत तारग्एत असे म्हटले जाते त्यामुळेच ठिकाणी निवडतांना सामान्य माणसाच्या मनात दहशत बसले अशीच निवड करतात सरकारी यंत्रणा राजकीय नेते यांच्या भोवती सुरक्षा कवच असल्यामुळे हल्ले करणे कठीण जाते .त्याला ञरद तारग्एत म्हटले जाते. जनतेवर केलेल हल्ले सोपे व अधिक घातक असतात दहशतवादी तुमच्या शासन व्यवस्थेच्या कार्यक्षमते विषयी अविश्‍वासाचे वातावरण निर्माण होते त्यातच दहशतवादी गटाचे खरे यश असते भारतात त्यांनी अनेक वेळा अशा प्रकारची आक्रमणे केलेली आहेत. उदा ः ७ सप्टेबर २०११ दिल्ली उच्च न्यायालया समोरील बॉबस्फोट

मादक पदार्थाची तस्करी अवैद्य शस्त्रनिर्मिती काळा पैसा च्या माध्यमातून दहशतवाद पोसला गेलेला आहे. धर्माच्या आधारावर मिळणाया सहानभुती मूळे दहशतवादी गट अधिक क्रियाशील झालेले आहे. नवीन तंत्रज्ञानाचा ते वापर करीत आहे "असिमट्रीकल वारफेअर" संकल्पनेच्या भोवती भारतातील त्यांच्या कारावाया दिसून येतात गुप्तचर यंत्रणा सक्रिय केलेली असली तरी मुळ स्त्रोतापार्यत आणखीण ही पोहचू शकत नाही हे खरे आव्हान आहे दहशतवादी हल्ले करण्यासाठी भारतात स्थानिक गट ह्यस्लिपर सेल ह कार्य रत झालेले निष्पन्न होत आहे त्यांच्या सहभागाशिवाय गर्दीच्या ठिकाणी हल्ले होऊशकत नाही साधारणः ४ ते १० जणांचा स्थानिक लोंकाचा गट हल्ला होण्यापूर्वी २ते३ महिने अगोदर कार्यरत असतो बॉबसाठीचे सामान गोळा करणे ते जोडणे व ठिकाण ठरवून पळून जाण्याचा योग्य मार्ग निवडणे ही त्यांची जबाबदारी असते. अशा प्रकारच्या लोकांचा सुगावा शोधण्यासाठी मानवी गुप्तहेर हे तांत्रिक हेरापेक्षा महत्वाची ठरतात उदा ः अमेरिकन ओसामा बिन लादेनचा शोध घेण्यासाठी आधुनिक तंत्रासोबत मनुष्य गुप्तहेरांचाच आधार घ्यावा लागला म्हणूनच भारतात विविध प्रकारच्या दहशतवादी गटाने अशा तंत्राचाच अवलंब करून सुरक्षेसमोर आव्हान निर्माण केले आहे.

### दहशतवादी संघटना :-

भारतामध्ये घातपात घडविणाया काही दहशतवादी संघटनाचा इथे उल्लेख केलेला आहे.

१ जम्मु – काश्मीर लिबरेशन f`MT (JKLM) २. हिजबुल मुजाहिद्दीन

३. जैश – ए – महम्मद ४. हुजी ५ हरकर्त उल – मुजाहिद्दीन

६ हरकर्त उल – अन्सर इ १०. इंडियन मुजाहिद्दीन

### दहशतवादाची प्रभावी तंत्रे व भारतातील घटना :-

दहशतवादी गट प्रभाव निर्माण करण्यासाठी विविध तंत्राचा नवीन शस्त्रांचा वाहतुकीच्या सांधनाचा अवलंब करताना आढळून येतात भारतातील काही घटनांचा उल्लेख इथे त्याच अनुषंगाने केलेले आहे सामाजिक सुरक्षेसाठी सरकारी यंत्रणा अपयशी ठरत आहे हे प्रश्‍नचिन्ह समाजासमोर निर्माण करण्यात ते यशस्वी होतात.

#### १. संचार सेवा नष्ट करणे ः

राष्ट्रातील दळणवणाची साधने नष्ट करून राष्ट्राच्या आर्धिक स्थैर्याला धक्का देणे हा त्यांच्या उद्देश दिसून येतो. रेल्वे टेलिफोन यंत्रणा दुरदर्शन आकाशवाणी इ. नैसर्गीक वायू व खनिज तेलांची ने आण करणारी साधने हि त्यांची लक्ष्य असतात उदाः काश्मीर मधील दहशतवादी गट आसाम मधील उल्फा संघटना यांनी अशा प्रकारचे हल्ले केलेले आहेत. तसेच मुबंई २००७ लोकल ट्रेनमधील बॉबस्फोट

#### २. अपहरण करणे व ओलिस ठेवणे :-

आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी महत्वाच्या व्यक्तीचे अपहरण विमान अपहरण शाळेच्या बसचे इ. मार्ग देखील ते निवडतात उदाः १९९९ ला (आय. सी ) ८१४ या प्रवासी विमानांचे अपहरण करून जैश ए. मोहम्मदच्या प्रमुखाची केलेली सुटका.

#### ३. आत्मघाती हल्ले :-

काश्मीरमध्ये लष्कराचे मनोबल कमी करण्यासाठी दहशतवादी गटांकडून लष्करी छावण्यांवर हल्ले करण्यासाठी फिदायीन या आत्मघाती तंत्राचा ते अवलंब करीत आहे. याशिवाय लोकशाहीची मंदिरे देखील सुरक्षित नाही हे दाखवून देण्यासाठी १ ऑक्टो २००१ काश्मीरच्या विधानसभेवर केलेला हल्ला असो अथवा १३ डिसेंबर २००१ ला संसदेवरील हल्ला त्यांचा प्रभाव निर्माण करतात.

#### ४. नरसंहार घडविणे :-

सर्वसामान्य जनतेमध्ये भिती निर्माण करण्यासाठी भर बाजारात गोळीबार करणे बॉबस्फोट घडविणेअशा प्रकारचे कृत्य केले जाते. उदा ः २६ नोव्हेंबर २००८ मधील मुंबईवरील हल्ला ७ सप्टेबर २००१ दिल्ली उच्च न्यायालयातील बॉबस्फोट इ

#### ५. धर्मिक स्थळावर हल्ले :-

भारतात सामाजिक दंगली निर्माण व्हाव्यात या उद्देशाने धर्मिक स्थळावर हल्ला करण्याचे हे त्यांचे नवीन सामाजिक तंत्र दिसून येते उदाः अजमेर वाराणसी हैद्राबाद जामा मस्जिद अक्षरधाम येथील दहशतवादी हल्ले यांचेच सुचक आहेत.

या काही महत्त्वपूर्ण तंत्राचा वापर ते वेगवेगळया पद्धतीने करताना आढळून येतात

### उपाययोजना :-

भारताला दहशतवादा विरोधात दिर्घकाळ लढा द्यावा लागणारा आहे. त्यामुळे केल्या जाणाया उपाययोजना ह्या सर्वसमावेशक असणे महत्वाचे आहे कठोर कायदे राजकीय ईच्छाशक्ती आधुनिक शस्त्रास्त्रे याला प्राधान्य दिले तर दहशतवादावर नियंत्रण मिळविता येईल.

१. दहशतवाद विरोधी लढा प्रथमतः राजकीय पातळीवर करावा जनतेमध्ये विश्‍वास निर्माण करणे प्रभावित क्षेत्राचा विकास करणे महत्वाचे आहे.

२ लष्करी बळाचा वापर करून दहशतवादा विरूद्ध कठोर कारवाई करणे.

३ दहशतवाद्यांसाठी वेगळे कायदे करून तात्काळ शिक्षेची अंमलबजावणी करणे.

४ दहशतवादी कारवायांना जास्त प्रसिद्धी देऊनये कारण हेच त्यांचे मुख्य शस्त्र आहे. सध्याची प्रसार माध्यमे पाहिली तर हे लक्षात येते भडक प्रसिद्धी दिल्याने त्यांचा संदेश जनतेपर्यत जातो त्यामुळेच प्रसारमाध्यमानी योग्य भुमिका निभावावी

.५ गुप्तहेर यंत्रणा उचतंत्रज्ञानाने कार्यक्षम असावी पण त्यासोबतच मानवी गुप्तहेरांची भुमिका महत्त्वाची असावी त्यांच्याकडून प्राप्त होणारी माहिती अचूक असेल तर बळाचा वापर होईल.

६ स्थानिक पोलिस यंत्रणा अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची सुसज्ज असावी.

७ राष्ट्रीय सुरक्षा एजेंसी दहशतवाद विरोधी पथक स्थानिक पोलिस गुप्तहेर यंत्रणा यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे.

८ काश्मीरच्या आसामच्या संर्दभात दहशतवादी गटांसोबत वेळप्रसंगी बोलणी तर कधी चोख उत्तर देणे आवश्यक आहे.

९. इस्त्रायल सारख्या राष्ट्राचे धोरण स्वीकारून शेजारील राष्ट्रामध्ये असणारी दहशतवादी केंद्रे नष्ट करावीत त्यासाठी योग्य राजकीय मुत्सदी धोरण अवलंबवावे.

१०. राजकीय मतभेद विसरून कठोर कायद्यांची निर्मिती करणे. उदाः अमेरिकेतील हेम्एलन्द स्एचुरतिय कायदा.

११ सर्व लोकांना सतर्क राहून संशयीत लोकांविषयी पोलिसांना माहिती द्यावी

### निष्कर्ष :-

भारतातील राजकीय सामाजिक परिस्थीमुळे दहशतवादाचे आव्हान निर्माण झालेले आहे. राष्ट्रांच्या संरक्षणासाठी जीवाची पर्वा न करता लढणाया

सैनिकासाठी पोलिस दलांसाठी मानवतेच्या रक्षणासाठी राष्ट्राच्या विकासासाठी सर्व समाजाने एकत्र येऊन दहशतवादा विरोधात लढा देणे आवश्यक आहे सरकारी यंत्रणा लष्करी कृतीचे बळ त्यासाठी तितकेच आवश्यक आहे

## संदर्भ ः


1 ,khatri- terrorism in south aria- shipra publications,new delhi

२. डॉ. गोखले शरदचंद्र - झुंज दहशतवादाशी - चिनार प्रकाशन पुणे

३. प्रा. उदगावकर म. न , - २१ व्या शतकातील दहशतवाद डायमंड प्रकाशन पुणे

४. मेजर जनरल पित्रे शशिकांत - डोमले ते कारगील - राजहंस प्रकाशन पुणे

५ योजना मासिक – एप्रिल - २००६

६ दै लोकसत्ता दै महाराष्ट्र टाईम्स ज्ञ २६ नोव्हेबंर २००९

७. दै सकाळ ज्ञ ८ सप्टेंबर २०११